**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आयोगाची प्रशासकीय आणि पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा.

- ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या तीर्थदर्शन योजनेचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राज्यस्तरीय प्रारंभ

- मुंबई विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीत सर्व १० जागांवर युवासेनेचे उमेदवार विजयी

- देशाचा परकीय चलन साठा ६९२ अब्ज २९ कोटी डॉलर्स या उच्चांकावर

**आणि**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवर ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार

**<><><><><>**

राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्याच्या अनुषंगानं केंद्रीय निवडणूक आयोगानं आज मुंबईत सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी, महापालिका आयुक्त, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्यासह निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि डॉ. संधू यांच्यासह

इतर वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. यासंदर्भात आयोगानं काल संध्याकाळी विभागीय आयुक्त, पोलीस महानिरीक्षकांची बैठक घेतली होती.

**<><><><><>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज कोल्हापुरातून मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी दूरदृश्य प्रणालीमार्फत या योजनेतील पहिल्या कोल्हापूर ते अयोध्या या रेल्वेगाडीला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी पालकमंत्री हसन मुश्रीफ प्रत्यक्ष उपस्थित होते. या पहिल्या रेल्वेगाडीतून ८०० ज्येष्ठ नागरिक रवाना झाले असून आपली वडीलधारी मंडळी ही आपली जबाबदारी असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. या योजनेच्या माध्यमातून ६० वर्षावरील सर्व धर्मीय ज्येष्ठांना विविध ठिकाणी तीर्थयात्रा घडवण्यात येणार आहे.

**<><><><><>**

नवी मुंबईच्या तळोजा इथं तयार होत असलेलं वकील अकादमी आणि संशोधन केंद्र न्यायदानाच्या विविध क्षेत्रांमध्ये उत्तम काम करेल, शिवाय कायदे तयार करण्याच्या प्रक्रियेत न्यायपालिकेतल्यांचं योगदानही महत्त्वाचं ठरेल, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषदेच्या पुढाकारानं उभारण्यात येणार असलेल्या वकील अकादमी आणि संशोधन केंद्राचं भूमिपूजन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी उपमुख्यमंत्री बोलत होते. आज न्यायदानाचं क्षेत्र वेगाने बदलत आहे, तंत्रज्ञानामुळे मोठे बदल घडत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर या क्षेत्रात

वाढत आहे. हे सगळे बदल आपल्या वकिलांपर्यंत पोहोचवण्याचं कामही अशा अकादमींच्या माध्यमातून होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसंच या अकादमीसाठी दहा कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणाही केली. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती ए. एस. गडकरी, न्यायमूर्ती नितीन सांभरे, राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

‘स्वच्छता ही सेवा’ अभियान सध्या देशभरात राबवलं जात आहे. पर्यावरण रक्षणासाठीही हे अभियान उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. धाराशिव जिल्ह्यातले परिषद शाळांचे मुख्यध्यापक पडवळ यांनी या अभियानाविषयी सांगितलं.

**होल्ड --- बाईट...पडवळ**

त्याच शाळेतली विद्यार्थिनी या अभियाना विषयी म्हणाली….

**होल्ड - बाईट -----**

परभणी इथं आज स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी सायकल मॅरेथॉन रॅली काढण्यात आली. महापालिकेसह सायकलिस्ट ग्रुप आणि प्रभावती ग्रुप यांच्यातर्फे या रॅलीचं आयोजन करण्यात आलं होतं. यात विविध शासकीय कर्मचारी, व्यावसायिक, अन्य नागरिक तसंच शालेय विद्यार्थ्यांनी सहभागी होत उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला.

**<><><><><>**

कृषी आधारित पर्यटनासाठी रत्नागिरी जिल्ह्यातल्या कर्दे गावाला राष्ट्रीय पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. जागतिक पर्यटनदिनानिमित्त काल नवी दिल्ली इथं झालेल्या कार्यक्रमात उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते कर्दे गावचे सरपंच सचिन तोडणकर यांनी पुरस्कार स्वीकारला. तोडणकर यांनी नंतर आकाशवाणीशी बोलताना आनंद व्यक्त केला.

**बाईट- सचिन तोडणकर**

**<><><><><>**

मुंबई विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीत आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील युवासेनेचे उमेदवार सर्व १० जागांवर विजयी झाले. खुल्या प्रवर्गातल्या ५ जागांवर प्रदीप सावंत, मिलिंद साटम, अल्पेश भोईर, परमात्मा यादव आणि किसन सावंत हे उमेदवार विजयी झाले. राखीव प्रवर्गातून शीतल शेठ देवरुखकर, धनराज कोहचाडे, शशिकांत झोरे, मयुर पांचाळ आणि स्नेहा गवळी हे उमेदवार निवडून आले.

**<><><><><>**

भारताच्या परकीय चलन साठ्यात २ अब्ज ८३ कोटी डॉलर्सने वाढ होऊन तो २० सप्टेंबर रोजी संपलेल्या आठवड्यात ६९२ अब्ज २९ कोटी डॉलर्स एवढ्या उच्चांकावर पोहोचला आहे. गेल्या आठवड्यात यात २२ कोटी ३० लाख डॉलर्सची वाढ झाली होती.

भारताच्या सुवर्ण साठा मूल्यातही ७२ कोटी ६० लाख डॉलर्सने वाढ होऊन तो ६३ अब्ज ६१ कोटी डॉलर्स वर पोहोचला आहे. आंतरराष्ट्रीय

नाणेनिधीतून देशाच्या विशेष आहरण अधिकारातही १२ कोटी १० लाख डॉलर्सने वाढ होऊन तो १८ अब्ज ५४ कोटी डॉलर्सवर पोहोचला आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या, २९ सप्टेंबर रोजी आकाशवाणीवर ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशविदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा ११४ वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, आकाशवाणी वृत्त संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एआयआर या ॲपवर प्रसारित केला जाईल.

<><><><>

चंद्रपूर परिमंडळात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ एक हजार १५२ ग्राहकांनी घेतला आहे. या ग्राहकांच्या घरावर सौर पॅनल बसवलं असून त्यातून घरासाठी वीज निर्मिती केली जात आहे. यातून निर्माण झालेली शिल्लक  वीज महावितरण खरेदी करतं. छतावर सौर पॅनेल बसवलेल्या घरांपैकी ८१९ घरं चंद्रपूर जिल्ह्यातली आहे.

<><><><>

महाराष्ट्र हे देशाचं एक आर्थिक केंद्र असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राज्यात झालेल्या विविध विकासकामांमुळे देशाच्या विकासात राज्याची भूमिका महत्त्वाची ठरणार असल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी म्हटलं आहे. ते काल पुण्याजवळ लोणी काळभोर इथल्या एमआयटी एडीटी युनिव्हर्सिटी महाविद्यालयात आयोजित  'विकसित भारत ॲम्बेसेडर - युवा कनेक्ट' कार्यक्रमात बोलत होते. या उपक्रमात

राज्यातल्या विविध महाविद्यालयांमधल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात येत आहे.

**<><><><><>**

नांदेड तालुक्यातल्या नेरली कुष्ठधाम इथं सार्वजनिक पाणीपुरवठ्याच्या टाकीतलं पाणी प्यायल्यानं २०० हून अधिक गावकऱ्यांना विषबाधा झाली आहे. डोकेदुखी, चक्कर येणे, उलट्या अशी लक्षणं आढळल्यावर या रुग्णांना काल मध्यरात्रीपासून नांदेड शासकीय रुग्णालय तसंच खाजगी रुग्णालयात दाखल केलं आहे.

**<><><><><>**

अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती कोकण प्रांत आणि छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण यांनी एक दिवसीय महिला साहित्य संमेलनाचं आयोजन केलं आहे. सानपाड्यातील विवेकानंद संकुलात हे संमेलन आहे. कथाकथन, काव्यवाचन, व्याख्यान आदी कार्यक्रम या संमेलनात झाले.

**<><><><><>**

मुंबईत दहशतवादी हल्ले होण्याची शक्यता असल्याचा इशारा केंद्रीय तपास यंत्रणांकडून मिळाल्यावर पोलिसांनी शहरात हाय अलर्ट जारी केला आहे. गर्दीच्या ठिकाणी बंदोबस्त वाढवला आहे. आगामी नवरात्रौत्सव लक्षात घेऊन मंदिरं आणि प्रार्थनास्थळांवरही कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात येत आहे. प्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिराचा त्यात समावेश आहे. सुरक्षेच्या दृष्टीनं भाविकांसाठी नियम जाहीर केले आहेत.

**<><><><><>**

थोर क्रांतिकारक भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

गानकोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. ७० वर्षाहून जास्त काळाच्या प्रदीर्घ कारकिर्दीत लता मंगेशकरांनी गायलेली २५ हजारांपेक्षा जास्त गाणी ध्वनिमुद्रीत झाली.

**//<><><><><>//**